# - प्रेस नोट -

दि. ०२/०८/२०२६

## शिवाजीनगर पोलीस ठाणे - खुनाचा प्रयत्न

दि.०१/०८/२०२६ रोजी ०२.०० वा. ते ०२.२५ च्या दरम्यान फिर्यादी मोहम्मद शाहिद मोहम्मद मुन्ना मन्सुरी, वय-२६ वर्षे, धंदा-मलाई विक्रेता, रा.ठी- संत निरंकारी नगर, ९० फीट रोड, बैगणवाडी गोवंडी मुंबई हे त्यांच्या राहते घराकडे जात असताना प्लॅट नं.४१, रोड नं. ०८ वर, बैगणवाडी येथे आले असता, त्यावेळी फिर्यादीच्या परिचयाचा विधीसंघर्षग्रस्त बालक क्र.०१ याचे सोबत मलाई घेण्यावरुन झालेल्या वादातुन विधीसंघर्षग्रस्त बालक क्र.०१ हा त्याचे मित्र विधीसंघर्षग्रस्त बालक क्र.०२ व अटक आरोपी पुरुष, वय-१९ वर्षे यांना सोबत घेवुन आला. त्यावेळी विधीसंघर्षग्रस्त बालक क्र.०१ व विधीसंघर्षग्रस्त बालक क्र.०२ याने फिर्यादीला शिवीगाळ करण्यास सुरुवात केली, त्यावेळी फिर्यादी विधीसंघर्षग्रस्त बालक क्र.०१ यास समजवत असताना अटक आरोपी पुरुष, वय-१९ याने त्याचे कमरेवरील चाकु काढुन फिर्यादीला शिवीगाळ करत  जीवे ठार मारण्याची धमकी देऊन पाठीवर दोन वेळा चाकु खुपसला म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि.०१/०८/२०२६ रोजी गु.र.क्र. ४८१/२६, कलम १०९(१), ३५१(३), ३५२, ३(५) बीएनएस २०२३, ३७(१)(ए) महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

---------------------